**आमच्याविषयी.......**

पश्चिम महाराष्ट्रातून आलेले व मुंबईतील विक्रोळी-भांडुप परिसरात राहाणारे काही सातारकर बांधव एकत्र आले. त्यांनी सातारा जिल्हा विकास मंडळाची स्थापना केली. 1980 च्या दशकात, गिरणी कामगारांचा संप व सावकारी कर्ज तसेच इतर अनेक आर्थिक अडचणींवर सामान्य जनतेस मात करता यावी, तसेच त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहाता यावे या उदात्त हेतूने एक आर्थिक संस्था स्थापण्याचा विचार सुरू झाला. व तिथुनच 22 नोव्हेंबर 1982 रोजी केवळ 520 सभासद आणि 25 हजार रूपयांच्या भागभांडवलावर शिवकृपा पतपेढीची स्थापना झाली.

शिवकृपा सहकारी पतपेढीचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून, संस्थेचा मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, कोकण, पुणे, सातारा, सांगली व कोल्हापुर मध्ये एकूण 100 शाखांचा विस्तार आहे. तसेच शाखांवर नियंत्रण ठेवण्यासाठी 7 विभागीय कार्यालये व ठाणे येथे प्रशासकीय कार्यालय आहे. संस्थेच्या 108 कार्यालयांपैकी 39 कार्यालये स्वमालकीची आहे. संस्थेच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता प्रशासकीय कार्यालयासाठी संस्थेने नवी मुंबई रबाळे येथे स्वमालकीचे 8 मजली प्रशस्त शिवकृपा भवन या इमारतीचे काम सुरू केले आहे.

महाराष्ट्रातील आदर्श व अग्रगण्य पतपेढी असा शिवकृपाचा नावलौकीक आहे. संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ आपला वैयक्तिक व्यवसाय - नोकरी सांभाळून संस्थेसाठी वेळ देत असतात. संचालक मंडळाच्या अंतर्गत कामकाजासाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. प्रत्येक शनिवारी संचालक मंडळा ची सभा आयोजित केली जाते . त्यामध्ये विविध विषयांवर सखोल चर्चा होते. शिवकृपाचे आज 3 लाख सभासद आहेत. तर राज्यभरातील शाखा-कार्यालयांमध्ये मिळून 800 कर्मचारी कार्यरत आहेत.

गुणात्मक दृष्ट्या संस्था महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांकावर असून संस्थेला स्थापनेपासूनच सातत्याने ऑडीट ‘अ’ वर्ग मिळत आहे. ग्राहकांच्या अधिकाधिक आर्थिक गरजा पुर्ण करण्याच्या दृष्टीने शिवकृपाने विविध कर्ज योजना सुरू केल्या आहेत. सुयोग्य कर्जवितरण प्रणाली आणि सातत्याने केली जाणारी कर्जवसुली यामुळे सतत नफ्यात असणारी हि संस्था बदलत्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अर्थकारणानुसार व्हिजन डोळ्यासमोर ठेवून मिशन राबवत असते.

अनुत्पादक कर्जाची वसुली करणेसाठी शाखास्तरावर कर्जवसुलीसाठी सातत्याने पाठपुरावा व त्यायोगे करावी लागणारी कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यामुळेच संस्थेची अनुत्पादित कर्जे कमीत कमी राखण्यात संस्थेस यश आले आहे.

सहकारावरचा लोकांचा विश्वास दृढ व्हावा यासाठी शिवकृपाने दादासाहेब साखवळकर पतसंस्था, ओमकार पतसंस्था व भैरवनाथ ग्रामीण सहकारी पतसंस्था या आर्थिक अडचणीत

आलेल्या काही पतसंस्थांचे विलिनीकरण करून संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार **सहकारांतर्गत सहकार** जोपासला आहे.

सहकार क्षेत्रात काम करताना संस्थेने सामाजिक बांधिलकी वृक्षसंवर्धन , दुष्काळग्रस्त भागासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, जलयुक्त शिवार या अभियानात संस्थेचा सक्रीय सहभाग आहे. संस्था नेहमीच विविध समाजोपयोगी उपक्रम राबवीत असते, त्यामध्ये बिगरहुंडा, सामुदायिक विवाह सोहळे, व्यसनमुक्ती आणि रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. देशात आलेल्या विविध आपत्तीप्रसंगी संस्थेने सढळहस्ते आर्थिक मदत केली आहे. संस्थेतर्फे पंढरीच्या वारीसाठी आलेल्या भाविकांना वैद्यकीय सेवा, वाचनसंस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने ग्रंथमहोत्सव व शाळांना आर्थिक मदत, विद्यार्थी दत्तक योजना व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो. शिवकृपाने महिलांच्या आर्थिक , सामाजिक उन्नतीसाठी, महिला बचत गटांसाठी विशेष सहकार्य केलं आहे.

संस्थेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वेळोवेळी नवनवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी कोरेगाव येथे संस्थेचे निवासी प्रशिक्षण केंद्र आहे. संस्थेचे पदाधिकारी, संचालक , सभासद आणि अधिकाऱ्यांचे वेळोवेळी चिंतन आणि प्रशिक्षण शिबिर घेण्यात येते. त्याद्वारे भविष्याचा वेध घेऊन व्हिजन आणि मिशन ठरविण्यात येतं. संस्थेच्या सर्व शाखा संगणकीकृत व अद्ययावत असून व्हिडिओ कॉन्फरंसिंगद्वारे सर्व विभागीय कार्यालयांशी संवाद साधला जातो. संस्थेमध्ये कोअर बंकींग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. BBPS द्वारे वीज बिल कलेक्शन, मोबाईल बिल व डीटीएच बिल भरणा केंद्र, ATM सुविधा , सभासदांना डेबिट कार्डद्वारे व्यवहार करण्याची सुविधादेखील लवकरच कार्यान्वित होत आहे. सर्व शाखा पॉवर बॅकअपसह सीसीटीव्ही व सिक्युरिटी सिस्टमद्वारे सुसज्ज आहेत. तेराशे हून अधिक दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी रोज मोबाईल द्वारे ठेव संकलन करतात. मेसेजद्वारे खातेदारांना मोबाईलवर त्यांच्या खात्याची अद्ययावत माहिती मिळते. सहकारवृद्धीसाठी शिवकृपा पतसंस्थेने नेहमीच मार्गदर्शक पालकत्त्वाची भूमिका घेतली आहे. त्याची दखल घेत अनेक सामाजिक संस्था आणि महाराष्ट्र राज्य शासनानेही संस्थेस विविध पुरस्कार देऊन गौरवले आहे. सन 2017-2018 सालाचा **सहकार भुषण** पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने शिवकृपाचा गौरव केला आहे . तसेच सलग दोन वर्षे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनने राज्यस्तरीय **दीपस्तंभ** पुरस्कार प्रदान करून संस्थेला गौरवले आहे.

सहकारातून समृद्धी हेच शिवकृपाच्या यशस्वी घोडदौडीचे गमक आहे. शिवकृपा पतसंस्थेने मिळवलेले पुरस्कार आणि सभासदांचा वृद्धींगत होत असलेला विश्वास याचे हे प्रतिक आहे.

सहकाराचे भूषण असलेली शिवकृपा राज्यातील सहकार चळवळीसाठी दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक आहे. याचा संस्थेचे संचालक , सभासद, ग्राहक सर्व कर्मचारी व ठेव वसुली प्रतिनिधी यांना मनस्वी अभिमान वाटतो.